# // प्रेस नोट //

दिनांक २९/०८/२०१८

**लोकसेविका १) रिजवाना जहीर सय्यद वय ४० वर्षे, म.पो.ना. १४२४ पो.स्टे. बीड शहर रा. राजीव नगर बीड २) खाजगी इसम सय्यद जहीर सय्यद महेबुब वय ३५ वर्षे धंदा मजुरी रा. राजीव नगर बीड यांना २,०००/- रुपयाची लाच घेतांना रंगेहात पकडले.**

---

दि.२८/०८/२०१८ रोजी तक्रारदार यांनी असेबी कार्यालयात हजर येवून तक्रार दिली की, तक्रारदार यांचे लातुर येथील कोर्टमध्ये (कलम १३८ एन.आय. ॲक्ट) प्रकरण सुरु असुन सदरचे वारंट बजावणी कामी पोलीस स्टेशन बीड शहर कडे आले आहे. लोकसेविका मपोना सय्यद रिजवाना यांनी तक्रारदार यांना सदर वारंट मध्ये अटक न करण्यासाठी २,०००/- रुपयाची लाचेची मागणी करीत आहेत. वगैरे मजकुराची तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक २८/०८/२०१८ रोजी बीड येथे लाचमागणी बाबत खात्री केली असता तक्रारदार यांचेकडे त्यांना अटक न करण्यासाठी लोकसेविका मपोना सय्यद रिजवाना यांनी २,०००/- रुपयाची लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरुन आज दिनांक २९/०८/२०१८ रोजी लोकसेविका सय्यद रिजवाना यांचे विरुध्द जुना नगर नाका, जिज्ञासा करीअर ॲकडमी, बीड समोर रोडवर लाचेचा सापळा आयोजित केला असता लोकसेविका मपोना रिजवाना सय्यद यांनी लाच रक्कम खाजगी ईसम **सय्यद जहीर सय्यद महेबुब यांचेकडे देण्यास सांगितलेवरुन खाजगी ईसम सय्यद जहीर सय्यद महेबुब यास तक्रारदार यांचेकडुन २,००० रुपये लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. त्यावरुन लोकसेविका १) रिजवाना जहीर सय्यद वय ४० वर्षे, म.पो.ना. १४२४ पो.स्टे. बीड शहर रा. राजीव नगर बीड २) खाजगी इसम सय्यद जहीर सय्यद महेबुब वय ३५ वर्षे धंदा मजुरी रा. राजीव नगर बीड** यांचेविरुध्द पोस्टे शिवाजी नगर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक (संशोधन) कायदा २०१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कारवाई मा.श्री.श्रीकांत परोपकारी,पोलीस अधीक्षक असेबी औंरगाबाद,मा.श्री.एस.आर.जिरगे, अपर पोलीस अधीक्षक, असेबी औरंगाबाद यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री.बाळकृष्ण हनपुडे पाटील, पो.नि. श्री.वाघ,पोह/दादासाहेब केदार, अशोक ठोकळ, बापु बनसोडे, पोना/विकास मुंडे, अमोल बागलाने, पोशि/राकेश ठाकुर, सखाराम घोलप, भरत गारदे, चालक नदीम व मेहत्रे यांनी केली आहे.

नागरिकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांचे सरकारी कामासाठी चोकसेविका लाचेची मागणी करीत असल्यास त्यांनी खालीलप्रमाणे संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| **टोल फ्री क्रमांक** | :- | १०६४ |
| **दुरध्वनी क्रमांक** | :- | ०२४४२/२२२६४९ |
| **मेल आयडी** | :- | dyspacbbeed@gmail.com |
| **वेबसाईट** | :- | www.acbmaharashtra.gov.in |
| **मोबाईल ॲप** | :- | www.acbmaharashtra.net |
| **फेसबुक पेज** | :- | www.facebook.com/MaharashtraACB |

२९/८

(बाळकृष्ण हनपुडे पाटील)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.